खडक पोलीस स्टेशन पुणे
दिनांक – २३/१२/२०१७

प्रेसनोट

---

**गाडयांची मोडतोड करुन दहशत निर्माण करणारा विशाल उर्फ जंगल्या सातपुते टोळीतील नामचीन गुंड राहुल ऊर्फ नळया राजरत्न लांडगे दुस-यांदा एक वर्षासाठी स्थानबध्द**

---

मा. रश्मी शुक्ला पोलीस आयुक्त पुणे शहर व मा. रविंद्र कदम पोलीस सह आयुक्त पुणे यांनी पुणे शहरात कोणताही अनुचित प्रकार घडु नये व आपले गुन्हेगारी कृत्याने वर्चस्व निर्माण करणारे टोळींचा समुळ नायनाट करण्यासाठी व अशा गुन्हेगार टोळीतील इसमाविरुध्द कडक व ठोस कारवाई करण्याबाबत पोलीस अधिकारी यांना आदेश दिलेले आहेत.

खडक पो. स्टे. पुणे चे हद्दीत राहणारा व विशाल ऊर्फ जंगल्या सातपुते टोळीतली गुंड गुन्हेगार इसम नामे राहुल उर्फ नळया राजरत्न लांडगे वय - २३ वर्षे रा - इनामके मळा, लोहियानगर, पुणे याचे पुर्व रेकॉर्डची पडताळणी केली त्याचेविरुध्द खडक पोलीस ठाणे परिसरात त्याचे साथीदारांसह तलवार, कोयता, लाकडी दांडके, दगड यासारखी जीवघेणी हत्यारे बाळगुन दुखापत करणे, जबरी चोरी करणे व इतर चो-या, महिलांना त्रास देणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत त्याने सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधा निर्माण झालेली होती. सदर गुन्हेगाराचे दहशतीमुळे सदर परीसरातील सर्वसामान्य नागरिक त्याचेपासून जिवीताचे व मालमत्तेचे नुकसानीचे भितीमुळे उघडपणे तक्रार करणेस धजावत नसल्याचे दिसून आल्याने त्यास यापुर्वी सन २०१३ मध्ये मा. पोलीस उप-आयुक्त परिमंडळ - १ यांनी पुणे शहर व पुणे जिल्हयातून एक वर्षासाठी हददपार केले होते परंतु त्याचे गुन्हेगारी प्रवृत्तीवर काहीए परिणाम होत नसलेचे व तो सातत्याने गंभीर स्वरुपाचे गुन्हे करीत असल्याचे व त्याच्या हालचाली संशयीत व समाजविघातक आढळुन आल्याने **मे २०१६ मध्ये त्यास एमपीडीअे अन्वये एक वर्षासाठी स्थानबध्द करण्यात आले होते.** त्यामध्ये तो जेलमधुन एक वर्षानंतर बाहेर आल्यानंतरही त्याचे वागणुकी मध्ये फरक पडलेला नव्हता व त्याचे गुन्हेगारी स्वरुपाच्या हालचाली चालु होत्या व त्याने बिबवेवाडी व भारती पोलीस स्टेशन पुणे च्या हददीमध्ये दंगा मारामारीचे गुन्हे करुन दुचाकी व चारचाकी वाहनांची मोडतोड करुन नुकसान केले होते त्याचेविरुध्द खडक, भारती विदयापीठ, बिबवेवाडी पोलीस स्टेशन पुणे येथे चोरी, घरफोडी, जबरी चोरी, दंगा मारामारी, गाडयांची तोडफोड करणे, घातकशस्त्र जवळ बाळगणे यासारखे गंभीर स्वरुपाचे एकुण सोळा गुन्हे दाखल आहेत.

उपरोक्त प्रमाणे नमुद गुन्हेगाराचे गुन्हेगारी कृत्यांचे अनुषगांने मा.रविंद्र सेनगावकर अपर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशि विभाग पुणे , मा. बसवराज तेली पोलीस उप-आयुक्त, परि -१ पुणे, मा. बाजीराव मोहीते सहायक पोलीस आयुक्त, शहर विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली खडक पो.स्टे. चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र मोकाशी, पो.नि. (गुन्हे) श्री. संभाजी शिर्के तपास पथकाचे पोलीस निरीक्षक आनंत व्यवहारे, संजय गायकवाड व पोलीस कर्मचारी सर्फराज शेख, महेश बारवकर, महेश कांबळे, अनिकेत बाबर, विनोद जाधव, रविंद्र लोखंडे, अशिष चव्हाण यांनी नमुद गुन्हेगाराची गुन्हेगारी पार्श्वभुमी व त्याचेवर दाखल असणा-या गुन्हयांची पडताळणी केल्यानंतर त्याप्रमाणे गुन्हयांची कागदपत्रे संकलीत करुन एमपीडीए कायदयान्वये सुयोग्य प्रस्ताव तयार केला.

**सदरचा एमपीडीए प्रस्ताव मा. श्रीमती रश्मि शुक्ला, पोलीस आयुक्त, पुणे यांचेकडे दाखल झाल्यानंतर त्यांनी दिनांक - १९/१२/२०१७ रोजी त्यास एक वर्षासाठी स्थानबध्द करण्याबाबत आदेश काढले आहेत. तसेच अशाप्रकारे गंभीर स्वरुपाचे गुन्हे करणा-या व गांडयांची मोडतोड करुन दहशत निर्माण करणा-या गुन्हेगाराविरुध्द कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलीसांना दिलेले आहेत.**

नमुद गुन्हेगार यास कारवाईबाबत कुणकुण लागल्याने तो फरार झाला होता त्याबाबत पोलीसांनी खब-याबाबत माहीती काढली तो तळजाई सहकारनगर या परिसरातील जंगलामध्ये लपवुन बसल्याची माहीती मिळाल्यानंतर त्यास सापळा रचुन त्यास दिनांक – २३/१२/२०१७ रोजी पकडण्यात आलेले आहे व त्यास दुस-यांदा एक वर्षासाठी स्थानबध्द करण्यात आले आहे व त्याची रवानगी येरवडा मध्यवर्ती कारागृह पुणे येथे करण्यात आहे .